खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

## मराठी विभाग – जागतिक महिला दिन

सकाळ

### राजगुरुनगर येथे 'जागर जाणिवांचा' अभियान

**राजगुरुनगर, ता. ११ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त 'जागर जाणिवांचा' अभियानांतर्गत विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन केले होते.

मराठी विभागाच्या वतीने २ ते ८ मार्च दरम्यान 'जागर जाणिवांचा' सप्ताह आयोजित केला होता. यानिमित्त विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली. महिलांच्या आत्मसन्मान शपथेचे वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. संदीप थोरात, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. हंसराज भांगे आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरू महाविद्यालयात आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमप्रसंगी उपस्थित विद्यार्थिनी आणि प्राध्यापकवर्ग.

या वेळी मुली व महिलांच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, मुलींची छेडछाड व कामाच्या ठिकाणी महिलांच्या छळास प्रतिबंध, मुलींचे घटते प्रमाण, स्त्रीवादी साहित्य इत्यादी विषयांवर चर्चासत्र, व्याख्यान, विद्यार्थी मनोगते आदींचे आयोजन केले होते.

निरोगी आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यामध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वालायोग्य संधी देऊन, स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. मांडे यांनी केले.

Pune, District-Today
12/03/2024 Page No. 6

# राजगुरू महाविद्यालयात 'जागर जाणिवांचा 'अभियान अंतर्गत विविध उपक्रम संपन्न


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने "जागतिक महिला दिना" निमित्ताने 'जागर जाणिवांचा अभियान' अंतर्गत विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. संदीप थोरात डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. हंसराज भांगे उपस्थित होते.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी निरोगी आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यामध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वाला योग्य संधी देऊन स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन केले. कु. अपेक्षा कर्वे हिने विद्यार्थिनींना उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले. कु. प्राजक्ता अंकुश हिने स्त्रीवादी कवितांचे वाचन केले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविकात संयुक्त राष्ट्र संघाने या वर्षी 'महिलांवर गुंतवणूक करा, प्रगतीची गती वाढवा' या संकल्पनेनुसार जागतिक महिला दिन साजरा करायचे ठरवले असल्याचे सांगितले. महिलांची सर्वच क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचे आपल्यासमोर आव्हान असून महिलांचे हक्क, प्रतिष्ठा आणि आत्मसन्मानासाठी सर्वांनीच जागरूक राहण्याचे उपस्थितांना आवाहन केले.



# जागर जाणिवांचा अभियानाचा समारोप

**राजगुरूनगर**, (वार्ताहर) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त २ ते ८ मार्च दरम्यान जागर जाणिवांचा अभियान राबविण्यात आले. या अभियानात विविध प्रबोधनात्मक उपक्रम घेण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, मच्छिंद्र मुळूक, रूपाली वायाळ, प्रतिमा लोणारी, संदीप थोरात, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, हंसराज भांगे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य पिंगळे यांनी निरोगी आणि सुसंस्कृत समाज

स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन केले. प्राजक्ता अंकुश हिने स्त्रीवादी कवितांचे वाचन केले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. महिलांची सर्वच क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचे आपल्यासमोर आव्हान असून, महिलांचे हक्क, प्रतिष्ठा आणि आत्मसन्मानासाठी सर्वांनीच जागरूक राहावे, असे त्यांनी सांगितले. डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी आभार मानले.


गोवा राज्य लॉटरी

Draw No.29 Ticket Rs.100/- राजश्री 100 मंथली लॉटरी Draw Date: 07-03-2024 6:30 PM

1st Prize ₹ 35 LAKHS E-56306

2nd Prize ₹ 1 LAKH जिंकले 22370 स्टॉ: श्री सिद्धी समर्थ एजन्सी, मुंबई रि: कोटकर लॉटरी, भोईवाडा

3rd Prize ₹ 10,000/- 0898 3502 4534 4755 8988

4th Prize ₹ 5000/- (COMMON TO ALL SERIES)

0876 1006 1730 4162 4458 5134 5341 7440 7667 9903

5th Prize ₹ 1000/- (COMMON TO ALL SERIES)

0035 0389 0993 1582 2670 4087 5942 6407 7055 9917

0371 0412 1119 2255 3341 4530 6028 6647 7449 9949

6th Prize ₹ 500/- (COMMON TO ALL SERIES)


दै. केसरी

पुढारी



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी 'जागर जाणिवांचा'चे आयोजन करण्यात आले.

# महिलांच्या आत्मसन्मानाची घेतली शपथ

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त शुक्रवारी (दि. ८) 'जागर जाणिवांचा' अभियानांतर्गत विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. संदीप थोरात, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. हंसराज भांगे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी निरोगी आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यामध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वाला योग्य संधी देऊन स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन केले. अपेक्षा कर्वे हिने विद्यार्थिनींना उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले. प्राजक्ता अंकुश हिने स्त्रीवादी कवितांचे वाचन केले. महिलांचे हक्क, प्रतिष्ठा आणि आत्मसन्मानासाठी सर्वांनीच जागरूक राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

मराठी विभागाच्या वतीने दि. २ ते ८ मार्चदरम्यान 'जागर जाणिवांचा' सप्ताहांतर्गत मुली व महिलांच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, मुलींची छेडछाड व कामाच्या ठिकाणी महिलांच्या छळास प्रतिबंध, मुलींचे घटते प्रमाण, स्त्रीवादी साहित्य इत्यादी विषयांवर चर्चासत्र, व्याख्यान, विद्यार्थी मनोगत आदींचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या आत्मसन्मान शपथेचे वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Mar 10, 2024 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

# राजगुरू विद्यालयात जागर जाणिवांचा अभियान



**। शिरोली : प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त जागर जाणिवांचा अभियानांतर्गत विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. संदीप थोरात डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. हंसराज भांगे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, अपेक्षा कर्वे हिने विद्यार्थिनींना उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले. प्राजक्ता अंकुश हिने स्त्रीवादी कवितांचे वाचन केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविकात केले. महिलांच्या आत्मसन्मान शपथेचे वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी मानले.

Pune_ Edition
Mar 9, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# राजगुरु महाविद्यालयात जागर जाणिवांचा अभियानाचे आयोजन

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त जागर जाणिवांचा अभियानांतर्गत विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना मुली व महिलांच्या आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली.



या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. संदीप थोरात डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. हंसराज भांगे उपस्थित होते.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी निरोगी आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यामध्ये महिलांचे योगदान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वाला योग्य संधी देऊन स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन केले. कु अपेक्षा कर्वे हिने विद्यार्थिनींना उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले. कु. प्राजक्ता अंकुश हिने स्त्रीवादी कवितांचे वाचन केले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविकात संयुक्त राष्ट्र संघाने या वर्षी 'महिलांवर गुंतवणूक करा, प्रगतीची गती वाढवा' या संकल्पनेनुसार जागतिक महिला दिन साजरा करायचे ठरवले असल्याचे सांगून महिलांची सर्वच क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचे आपल्यासमोर आव्हान असून महिलांचे हक्क, प्रतिष्ठा आणि आत्मसन्मानासाठी सर्वांनीच जागरूक राहण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

मराठी विभागाच्या वतीने दि. 2 ते 8 मार्च दरम्यान जागर जाणिवांचा सप्ताहाअंतर्गत मुली व महिलांच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, मुलींची छेडछाड व कामाच्या ठिकाणी महिलांच्या छळास प्रतिबंध, मुलींचे घटते प्रमाण, स्त्रीवादी साहित्य इत्यादी विषयांवर चर्चासत्र, व्याख्यान, विद्यार्थी मनोगते आदींचे आयोजन करण्यात आले.

महिलांच्या आत्मसन्मान शपथेचे वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ. श्वेतांबरी मांडे यांनी मानले

HRM

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**